ISO 9001:2015 Certified

(नोंदणी क्र. २९७७०)

# दि बी. ए. आर. सी. कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई

आर-५ शेड, बी.ए.आर.सी., ट्रॉम्बे, मुंबई - ४०० ०८५.

# 58व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त
# (दि.19 ऑगस्ट 2019)

दि बी.ए.आर.सी. एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि, मुंबई ची 58वी वार्षिक सर्वसाधारण सभा बीएआरसी सेंट्रल कॉम्प्लेक्स ऑडिटोरियम येथे **सोमवार** दि.19 ऑगस्ट 2019 रोजी दु.2.00 वाजता आयोजित केली होती. परंतु गणपुर्तीअभावी सदर सभा अर्ध्या तासासाठी तहकूब केली व त्याच ठिकाणी दु.2.30 वाजता ही सभा सुरु झाली.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती श्री शिवाजी महाराज, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर **आणि** अणुऊर्जाचे जनक डॉ. होमी जहांगीर भाभा या महापुरुषां**च्या प्रतिमेस अभिवादन करुन पुष्पहार अर्पण करण्यात आले.**

मा. सचिव श्री संजय गावंडे- मी संस्थेचा सचिव संजय गावंडे, संचालक मंडळाच्या वतीने 58व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असलेले सर्व मा. भागधारक सभासद, संस्थेचे **पदसिध्द अध्यक्ष मा.श्री अनंत वजरेकर साहेब, संस्थेचे** पदसिध्द उपाध्यक्ष डॉ. आर. मुरुगय्या साहेब, तज्ञ संचालक श्री बागल साहेब यांचे स्वागत करीत आहे. मी सर्व सभासदांना विनंती करतो, **या अहवाल वर्षात दिवंगत झालेल्या** सभास**दांना आणि महाराष्ट्र व इतर राज्यात अतिवृष्टीमुळे दिवंगत झालेल्या नागरिकांना** श्रद्धांजली वाहण्यासाठी आपण दोन मिनिटे **शांत** उभे राहूया. धन्यवाद!!!

मा. सचिव श्री संजय गावंडे- एक विनंती आली आहे लोकाधिकार समितीद्वारा वार्षिक सर्वसाधारण सभेचा कालावधी ठरविण्याबाबत. त्यांनी पत्रात विनंती केलेली आहे की सदर सभा स्थगित करुन पुढील दिवशी सुध्दा सुरु ठेवावी. (सचिवांनी पत्र वाचून दाखविले). सभासदांना निर्णय घ्यायचा आहे की आता ही सभा चालू ठेवायची की लोकाधिकार समितीच्या मागणीनुसार बाहेर घ्यायची याचा निर्णय घ्यावा.

**एक सभासद- अध्यक्ष महोदय, स्थानिय लोकाधिकार समितीने दि.13/08/2019 रोजी जे पत्र दिलेले आहे, त्याचा खुलासा करण्यात यावा. गेल्या वेळच्या सर्वसाधारण सभेच्या आधी दिलेल्या पत्राचा खुलासा या सर्वसाधारण सभेत करण्याची आवश्यकता नाही. स्थानिय लोकाधिकार समितीने काय पत्र दिले आहे ते मी आता वाचून दाखवतो (पत्र वाचन केले). अध्यक्ष महोदय, या पत्रात दोन विनंत्या आम्ही केलेल्या आहेत. शाकुंतलचा विषय या पत्रामध्ये नाही आहे. कृपया माझी संस्थेच्या सचिवाना नम्र विनंती आहे की त्यांनी सभागृहाची दिशाभूल न करता दिलेल्या पत्रकावर आणि त्यात जो विषय मांडला आहे त्याबद्दलच स्षटीकरण द्यावे. आणि बाकीच्या वेळेचे या सर्वसाधारण सभेपुढे मांडण्याची गरज नाही. अध्यक्ष महोदय, आपण या गोष्टीची नोंद घ्यावी ही विनंती.**

मा. सचिव श्री संजय गावंडे- **मागे लोकाधिकार समितीद्वारा पत्र देण्यात आले आहे. पदसिध्द अध्यक्ष यांनी शांतता निर्माण करण्याच्या आचरणाबाबत.**

श्री प्रकाश पाटील **(एस.आय.आर.डी)- तारीख सांगा. कुठल्या तारखेला दिले आहे.**

मा. सचिव श्री संजय गावंडे-**दि.31.07.2017 रोजीचे पत्र आहे.**

श्री प्रकाश पाटील **(एस.आय.आर.डी)- 31.07.2017 रोजीचे पत्र आहे, लोकांची दिशाभूल करु नका. आता अहवाल कोणत्या वर्षाचा आहे. दि.13.08.2019 रोजी तुम्हाला पत्र दिले आहे की सर्वसाधारण सभा पुढे ढकलण्यात यावी, कारण तुम्ही ही सर्वसाधारण सभा 16 ऑगस्टला ठरविली होती, आणि चार दिवस लागून रजा आल्या होत्या, एवढ्या लोकांच्या सह्या आल्यानंतर तुम्ही सर्वसाधारण सभा 19 तारखेला ठरविली. आम्ही त्या पत्रात सांगितलं होतं की सर्वसाधारण सभा 19 ऑगस्टनंतर ठेवा. कृपया सभासदांची दिशाभूल करु नका.**

श्री राजेश कळके **(सी.डी.एम.)-गावंडे साहेब, तुम्ही पद स्विकारताना सचोटीचे बंधपत्र लिहून दिले आहे. तुमच्या सद्सद् विवेक बुध्दीला काय पटतं ते** सांगा**. सभागृहाची दिशाभूल करु नका.**

**एक सभासद-गेल्या वेळेचे पत्र वाचून दाखविण्याचा आता काहीही संबंध नाही. ही सर्वसाधारण सभा एकाच वर्षाची आहे. त्यामुळे फक्त या अहवाल वर्षात आलेल्या पत्रावर विचार केला जावा.**

मा. सचिव श्री संजय गावंडे**-** मागील वर्षी स्थानीय लोकाधिकार समितीने पत्राद्वारे मागणी केली होतो कि वार्षिक सर्वसाधारण सभा शाकुंतलमध्ये घेण्यात यावी. ते सुद्धा पत्र वाचून दाखवितो.

**एक सभासद- हा विषय स्थानिय लोकाधिकार समितीचा नाही आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेचा अर्थ प्रथम तुम्ही समजून घ्या. नंतरच या पत्राचे वाचन करा.**

श्री सुरेंद्र सारंग **(ए.एफ.डी.)- साहेब, ही वार्षिक सर्वसाधारण सभा आहे, या सभेचा कालावधी बघा आणि त्या कालावधीमध्ये आलेल्या पत्रांचाच विचार करा, फक्त तेवढीच पत्रे येथे वाचून दाखवा.**

त्यानंतर सचिव श्री संजय गावंडे यांनी पत्राचे वाचन केले.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री**.** अनंत वजरेकर**- स्थानिय लोकाधिकार समितीच्या पत्रात केलेली विनंती आहे की, ही सभा दु.2.00 ते 6.00 नंतर पुढच्या दिवशी सूध्दा चालू ठेवावी. परंतु याबाबत आस्थापनाने होकार कळविण्यास असमर्थता दर्शविली आहे. मा. नियंत्रक, मा. मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी याबाबत कुठलीही समर्थता न दाखविल्याकारणाने या प्रश्नाचे उत्तर येथे मिळू शकत नाही.**

श्री प्रकाश पाटील (एस.आय.आर.डी)- **ठीक आहे. सभा सुरु करा.**

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री**.** अनंत वजरेकर**- पाटील, आपल्याकडे वेळ कमी आहे. चांगले प्रश्न उपस्थित करुन सभासदांचा फायदा करुन द्यावा ही विनंती.**

मा. सचिव श्री संजय गावंडे**-सभासदांच्या विनंतीनुसार आजची सभा ही सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत घेतली जाणार आहे. मी माननीय पदसिध्द अध्यक्षांना विनंती करतो की त्यांनी आपले मनोगत व्यक्त करावे.**

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री**.** अनंत वजरेकर- सर्व **प्रथम आजच्या सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित असलेल्या सर्व सन्माननिय सभासदांचे मी स्वागत करतो आणि आजची सभा अत्यंत शांतपणे पार पडेल अशी आशा व्यक्त**

**करतो. आपल्याकडे सहकार क्षेत्रातील अनुभव असलेल्या व्यक्ती येथे आहेत. खरोखरच कळकळीचे प्रश्न हे लोक येथे उपस्थित करतील आणि आजच्या या सभेला विशेष महत्व** देऊन **जास्तीत जास्त सभासदांचा फायदा होईल आणि आजची सर्वसाधारण सभा यशस्वी होईल अशी देखिल आशा मी व्यक्त करतो.** ही सभा पूर्णपणे यशस्वीरित्या पार पाडण्यास आपण सर्वांनी सहकार्य करावे. **कमीत कमी वेळेत अत्यंत महत्वाचे / कळकळीचे प्रश्न उपस्थित करावेत. सर्व प्रश्नांची उत्तरे आपणांस दिली जातीलच. नाही मिळाली, तर लेखी स्वरुपात उत्तरे देण्याची व्यवस्था केली जाईल. आता मी सर्व सभासदांचे आभार मानतो की गेल्या सर्वसाधारण सभेमध्ये कर्ज संरक्षण निधी योजना आपण सर्वानुमताने आणि एक दिलाने मंजुर केलीत त्याबद्दल मी आपल्या सर्वांना धन्यवाद देतो. या कर्ज संरक्षण निधि अंतर्गत एकूण 14 मृत सभासदांचे रु.79,12,996/- इतके कर्ज माफ झालेले आहे. याबाबतीत सर्व सभासदांना जेवढे धन्यवाद द्यावे तेवढे कमीच आहेत. असेच महत्वाचे निर्णय आपण घ्यावेत आणि ही सभा यशस्वी करावी अशी मी आपल्याला विनंती करतो. आणि आता जास्त वेळ न घेता वेळेचे भान ठेवून** मी सभेची पुढील कार्यवाही सुरु करण्यास चेअरमन श्री मडगांवकर यांना विनंती करतो. धन्यवाद!

चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती श्री शिवाजी महाराज, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न प.पू.डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बीएआरसी आस्थापनाचे जनक डॉ. होमी जहांगीर भाभा यांना विनम्र अभिवादन करुन आजच्या या **58**व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असलेले संस्थेचे पदसिध्द अध्यक्ष आदरणीय श्री अनंत वजरेकर साहेब, संस्थेचे सचिव श्री संजय गावंडे, संस्थे**च्या** उपाध्यक्षा **श्रीमती** तृप्ती मुखर्जी, खजिनदार आम्रपाली मोरे, सहसचिव श्री एस.आर.सोनी, संस्थेचे माजी चेअरमन जनार्दन पवार, उपस्थित सर्व संचालक, सभासद बंधु भगिनींनो आणि माऊलींनो, सर्व प्रथम **संस्थेच्या वतीने जाहिर आवाहन करीत आहे की, नुकताच जो महाराष्ट्र राज्यामध्ये पश्चिम महाराष्ट्र, कोकण विभाग येथे अतिवृष्टी होऊन जो जलप्रलय झाला त्यामध्ये त्या विभागाचे अतोनात नुकसान झालेले आहे. त्यास सभासदांनी सढळ हस्ते मदत करावी संस्थेच्या वतीने रु. 1 लाखाची मदत मा. मुख्यमंत्री निधीस अर्पण करीत आहोत. या व्यतिरिक्त त्या विभागातील विद्यार्थ्यांचे जे**

अतोनात नुकसान झाले आहे त्या विद्‌यार्थ्यांस मदत म्हणून शालेय वस्तुंचे संकलन संस्थेच्या वतीने करीत आहोत. प्रत्येक सभासदाने जर एक वही व एक पेन संस्थेकडे जमा केले तरी अनेक विद्‌यार्थ्यांचे भवितव्य घडेल. ते सर्व साहित्य संचालक स्वखर्चाने पुरग्रस्त विभागात नेऊन देतील. संकलन केंद्रे कुठे असतील याची माहिती लवकरच बीटीएसद्‌वारे सभासदांसमोर मांडली जाईल.

आजच्या या 58व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस सामोरे जात असताना अत्यानंद होत आहे की मागील 4 वर्षाचा कालखंड पाहता जी वचने या कार्यकारिणीने दिली होती त्याची पुर्तता आम्ही केली आहे. यामध्ये प्रामुख्याने उल्लेख करीन दिवंगत सभासदांच्या कुटुंबियांस रु.1 लाखाची मदत संस्थेच्या वतीने दिली जाते. त्याचा खूप मोठा आधार त्या कुटुंबियांस होतो कारण मृत्युनंतर सर्व कागदपत्रे सरकार दप्तरी नोंद होईपर्यत जवळपास 6 महिने आस्थापनाकडून कुठल्याही प्रकारची मदत त्या कुटुंबियास मिळत नाही, तेव्हा रु.1 लाखाची रक्कम खुप मोलाची असते. त्यामधुन त्यांचा पूर्ण घरखर्च भागविला जातो.

1 ऑक्टोबर 2018 पासुन रु.12 लाखापर्यंतची कर्जमाफी दिवंगत सभासदांस देत आहोत. त्यामुळे जामिनदार व त्याचे कुटुंबिय यांस मोठा दिलासा मिळत आहे. भविष्यामध्ये संपूर्ण कर्जास कर्जमाफी देण्याचा या कार्यकारिणीचा मानस आहे.

संस्थेच्या 53 वर्षाच्या इतिहासात जेथे संस्थेची 53 पैशाची देखील असेटस नव्हती तिथे आज चार वर्षात संस्थेची नऊ कोटी पंचवीस लाखाची तरलता निर्माण करण्यात आमची कार्यकारिणी यशस्वी झाली आहे.

तसेच संस्थेच्या 53 वर्षाच्या इतिहासामध्ये 5.5%चा डिव्हीडंड सभासदांनी अनुभवला असता मागील 4 वर्षामध्ये दुसऱ्यांदा 18% डिव्हीडंड जाहीर करीत आहोत. याचा मला सार्थ अभिमान आहे.

आज विषय पत्रिकेवर विषय क्र.4 जो आपल्यासमोर ठेवला त्या विषयाबाबत या संस्थेचा चेअरमन म्हणून स्पष्ट करु इच्छीतो कि, मागील दोन वर्ष जेव्हा वार्षिक अहवालामध्ये हा विषय ठेवल्यानंतर हजारो सभासदांनी या योजनेचे कौतुक करुन लवकरात लवकर हा उपक्रम मार्गी लावा अशा सुचना लेखी स्वरुपात केल्या. परंतु या कार्यकारिणीने कोणत्याहि प्रकारची घाई न करता

**हा विषय वार्षिक सर्वसाधारण सभेसमोर ठेवला आहे. याचे कारण म्हणजे सद्यपरिस्थितीत कायद्यामध्ये जे बदल झाले आहेत त्यामुळे भविष्यात संस्थेस ज्या अडचणी निर्माण होणार आहेत त्यामधून मार्ग काढण्याचा या कार्यकारिणीचा प्रयत्न आहे.**

**जरी सभागृहाने हा प्रस्ताव मंजुर केला तरी माननिय सहकार आयुक्तांची परवानगी मिळाल्यानंतर पदसिध्द अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली बीएआरसी आस्थापनाची विजिलन्स कमिटी तसेच आस्थापनाचे सिविल इंजिनिअरिंग डिपार्टमेंट यांना सोबत घेऊन हा पूर्ण प्रोजेक्ट पुर्णत्वास नेण्याचा या कार्यकारीणीचा मानस आहे. त्यास होणारा विलंब लक्षात घेता कदाचित पुढील येणारी कार्यकारिणी यास अंतिम स्वरुप देऊ शकेल. जरी सभागृहाने या प्रस्तावास मंजुरी दिली नाही तरी या कार्यकारिणीचा कोणताही आक्षेप नसेल. सभागृह ज्या पध्दतीने मार्गदर्शन करेल त्याची निश्चितपणे अंमलबजावणी केली जाईल असे मी वचन देतो.**

**आमचे संचालक मुकुंद भास्कर यांचे खास कौतुक करतो की त्यांनी या वर्षी देखील अहवालावर सुंदर असे मुखपृष्ठ सादर करुन सहाकाराच्या झेंड्याचे रंग प्रतिबिंबित केले आहेत. त्याची कोणाला कल्पनाही नसेल. भविष्यात ते निश्चितच संस्थेचे उच्च पद सांभाळतील अशा त्यांना शुभेच्छा देऊन मी आपली रजा घेतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !**

मा. सचिव श्री संजय गावंडेः धन्यवाद मडगांवकरजी! आदरणीय अध्यक्षांच्या परवानगीने विषय पत्रिकेला सुरुवात करण्यापूर्वी **वार्षिक** अहवालामध्ये **ज्या छपाईच्या चुका झालेल्या आहेत त्या** दुरुस्त **करावयाच्या** आहेत.

**सचिवांनी दुरुस्त्या वाचायला सुरुवात करणार इतक्यात संस्थेचे पदसिध्द उपाध्यक्ष डॉ.आर. मुरुगय्या यांचे सभागृहात आगमन झाले.**

मा. सचिव श्री संजय गावंडे- **संस्थेचे पदसिध्द उपाध्यक्ष डॉ.आर. मुरुगय्या साहेब सभागृहात उपस्थित झाले आहेत, मी त्यांचे संचालक मंडळातर्फे स्वागत करतो.**

श्री प्रकाश पाटील (एस.आय.आर.डी)- **अध्यक्ष महोदय, कृपया छपाईतील चुका व त्यांच्या दुरुस्त्या हे वाचण्यात वेळ घालवू नका. सर्वांना मान्य आहे. कृपया पुढे विषयपत्रिकेप्रमाणे सभा सुरु करा.**

मा. सचिव श्री संजय गावंडे- **ठीक आहे. मी चुकीच्या दुरुस्त्या वाचत नाही.** आपण आपल्या कामकाजाला सुरुवात करीत आहोत.

सचिवांनी विषय क्रं.**1** वाचून दाखवला.

<u>विषय क्रं.**1**-दिनांक **24** ऑगस्ट **2018** रोजी झालेल्या **57** व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.</u>

मा. सचिव श्री संजय गावंडे- **57**व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सभासदांकरिता संस्थेत उपलब्ध करुन दिले होते. तसेच या सभागृहाच्या बाहेर देखील इतिवृत्ताच्या प्रती ठेवलेल्या आहेत. तर या इतिवृत्तास आपण मान्यता द्यावी अशी माझी विनंती आहे.

**श्री प्रभात सिंग - अध्यक्ष साहेब, तुम्ही इन्शुरन्सची स्किम आणताना 0.4% सांगितले होते, पण प्रत्यक्षात तुम्ही 0.5% घेत आहात. एक एक पैसा माणूस जोडतो. तुम्ही या बुकमध्ये लिहीले आहे 0.4% च्या आत होत आहे मग 0.5% कशाला. मी म्हणतो 0.3%, 0.4% घेऊ शकता. पण 0.5% खुप जास्त घेत आहात तुम्ही. यावर तुम्ही थोडा विचार करा. त्यावेळी तुम्ही काही बोलला नाहीत. जाधवजी बोलून निघुन गेले आणि तुम्ही पास करुन घेतले. एक साईडने पास करुन घेतलं तुम्ही. ठीक आहे. सभासदांच्या हिताचे आहे पण 0.5% खुप जास्त आहे.**

चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- **प्रभातजी तुमचं स्वागत आहे. पहिली गोष्ट जो सभासद कर्ज घेतो तोच 0.5% बेअर करत आहे. आणि पुढेही आम्ही विचार करु.**

**श्री सुरेंद्र सारंग (ए.एफ.डी.)-मी असं नमूद करु इच्छितो की, सभागृहाने सुध्दा सुचित केले होते. सभेचे जे मिनिट्स असतात ते कृपया अहवालासोबत जोडण्यात यावेत. कारण अहवाल पोहोचतो पण मिनिट्स पोहोचत नाहीत. त्यामुळे सभेला येताना काय बोलावे हेच कळत नाही. त्यामुळे पुढच्या वेळेला तरी अहवालामध्ये सुंदर सुंदर पेजेस देण्यापेक्षा कृपया अहवालासोबत मिनिट्सही येतील याची दक्षता घ्या.**

चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- **तुमची विनंती मान्य करण्यात येईल.**

**श्री शिवाजी हगवणे (यु.ई.डी.)- अहवालाविषयी बोलताना आमच्या चेअरमन साहेबांचे विशेष कौतुक आणि आभार मानावेसे वाटतात. मला वाटते एक विक्रमच त्यांच्या नावावर नोंदवला गेला आहे कारण या अहवालात एकूण 111 फोटो आहेत आणि त्याच्यामध्ये 82 फोटो त्यांचेच आहेत.**

**श्री राजेश कळके (सी.डी.एम.)-** चेअरमन **यांनी अल्बमच छापला आहे आमच्या पैश्यांवर.**

**श्री शिवाजी हगवणे (यु.ई.डी.)-मी दोन सुचना केल्या होत्या. पहिली सुचना होती संचालक मंडळाचा कार्यकाल छापावा. यावर्षी तुम्ही तो छापला आहे, त्याबद्दल अभिनंदन! पण या बावीस हजार अहवालांचा छापण्याचा खर्च किती येतो आणि दोन तासात तो कचऱ्याच्या पेटीत टाकला जातो.70-80 पानांचे मिनिट्स तुम्ही तरी वाचू शकता का? गेल्या चार वर्षांपासून माझी मागणी आहे की तुम्ही मिनिट्स आंम्हाला आधीच द्या, म्हणजे आंम्हाला वाचण्यास वेळ मिळेल. पण तुमच्या नशिबातच नाही ते बहुतेक. कारण हे तुमचे शेवटचे वर्ष आहे. आता पुढची कार्यकारीणीच निर्णय घेईल.**

मा. सचिव श्री संजय गावंडे- **5 ऑगस्टलाच मिनिट्स संस्थेमध्ये उपलब्ध करुन दिले होते.**

**श्री राम परब (यु.ई.डी.)-अध्यक्ष साहेब, मी तुम्हांला वैयक्तिक सांगतो की तुम्ही ह्यामध्ये लक्ष घाला. काही गरज नाही वेगवेगळे फोटो छापण्याची. कमीत कमी पानांचा अहवाल कसा छापता येईल याची काळजी तुम्ही घ्या. कारण आपल्याला आज आयात करावा लागतो पेपर.**

**श्री प्रकाश पाटील (एस.आय.आर.डी.)- अध्यक्ष साहेब, मिनिट्सबद्दल मी अनुमोदन देईनच. पण त्याहीपेक्षा संचालक मंडळाचे अधिकार काय आहेत बिल्डींग फंडाच्या बाबतीत त्याचे उत्तर द्या.**

**मागच्या सर्वसाधारण सभेत झालेले मिनिट्स आहेत, कृपया सर्वांनी जरा लक्ष देऊन ऐका. इतिवृत्तात पान क्र.43वर लिहिले आहे की बिल्डिंग फंडच्या बाबतीत सर्व अधिकार संचालक मंडळाला आहे. तर तुम्हाला तो अधिकार आहे का? होय किंवा नाही, उत्तर द्या.**

मा. सचिव श्री संजय गावंडे- **त्यानंतर मी असंही म्हंटलं आहे की वार्षिक सर्वसाधारण सभेस तो अधिकार आहे.**

**श्री प्रकाश पाटील (एस.आय.आर.डी.)- नंतर नाही, आधी तुम्ही काय म्हणाला होतात? तुम्ही वाचा पान क्र.43वर काय लिहीलं आहे ते. राजेश कळके बोलले होते** तुम्ही काही करायचे नाही. कुठेही जागा घ्यायची नाही. खूप मोठा अपहार होईल. हे चांगले नाही. सभागृहाने मंजुरी दिली आहे का तुम्हाला? **त्यावर तुम्ही बोलला होतात की संचालक मंडळाला याचा अधिकार आहे.**

मा. सचिव श्री संजय गावंडे- **संचालक मंडळाला जागा बघण्यासाठी जाण्याचा अधिकार आहे.**

**श्री प्रकाश पाटील (एस.आय.आर.डी.)-अहो, त्यांनी जागा खरेदीबाबत विचारले आहे. जागा बघण्याचा पार्ट नंतरचा आहे. अजेंडावर विषय नसतानासुध्दा तुम्ही जागा बघायला गेलात. याचे मला उत्तर द्या. माझ्याकडे उपविधी आहे, मी तुम्हाला वाचून दाखवतो.**

मा. सचिव श्री संजय गावंडे- **तुम्ही चुकीचा अर्थ काढत आहात.**

**श्री प्रकाश पाटील (एस.आय.आर.डी.)- उपविधी क्र. फ1.5 मध्ये स्पष्ट लिहीले आहे की वार्षिक सर्वसाधारण सभेच्या परवानगीने संस्थेसाठी जागा भाड्याने घेणे, म्हणजे जागा भाड्याने घ्यायला सुध्दा वार्षिक सर्वसाधारण सभेची परवानगी लागते. आणि तुम्ही सभागृहाची परवानगी न घेता लोणावळा, अलिबाग, खंडाळा येथे जाऊन आलात. त्यानंतर मागच्या वर्षी मी तुम्हाला याच सभागृहामध्ये प्रश्न विचारला होता किती संचालक आणि किती दिवस गेले होते? किती खर्च आला. त्या प्रश्नाचे उत्तर तुम्ही मला आज देताय, मी आठ दिवसांपूर्वी तुम्हाला पत्र दिले होते त्याचे उत्तर मला आज सकाळी मिळते आहे की, संस्थेमध्ये येऊन तुम्ही त्याचा खुलासा करावा. अहो, मी 2-3 वेळा संस्थेत येऊन गेलो, त्यावेळी तुम्ही एकाही वेळेला उत्तर दिले नाही. का नाही सांगितले मला?**

मा. सचिव श्री संजय गावंडे- **तुम्ही एकदाही संस्थेत आला नाहीत.**

**श्री प्रकाश पाटील (एस.आय.आर.डी.)-मला आमसभेत उत्तर पाहिजे असे मी सांगितले होते. मी संस्थेत येऊन गेलो. तुम्ही खोटं बोलत आहात.आजही मी**

**विचारतो आहे, मी दोन वेळा पत्र दिले होते, खर्च किती झाला मला फुटेज दाखवा.**

चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- **पाटील साहेब, संस्थेचे सचिव जर खोटं बोलत असतील तर तुम्ही रायटींगमध्ये दिले होते का तुमच्याकडे पोच आहे का त्या पत्राची.**

**श्री प्रकाश पाटील (एस.आय.आर.डी.)- मला आज पत्र मिळाले. पण त्यामध्ये माझ्या प्रश्नाचे उत्तर स्पष्ट नाही. संस्थेत येऊन बघा. अरे काय तेच करायचे का?**

मा. सचिव श्री संजय गावंडे-**तुम्ही संस्थेत आलेले नाही. तुम्ही स्पष्टपणे खोटे बोलत आहात सभागृहात की दोन वेळा येऊन गेलो म्हणून.**

**श्री प्रकाश पाटील (एस.आय.आर.डी.)-ठीक आहे, जाऊ द्या. ह्या सभागृहाला सांगा की, किती खर्च आला. बंधुनो, हा फार लोकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे.हा लोकांच्या घामाचा पैसा आहे आणि यावर तुम्ही लोक खुलेआम जनरल बॉडीची परवानगी न घेता लोणावळा, खंडाळा येथे दोन-दोन दिवस जाऊन हा संस्थेचा पैसा खर्च करताय. हा आम सभासदांचा पैसा आहे. ह्या सभागृहापुढे तुम्हाला याचे उत्तर द्यावे लागेल, आत्ताच्या आत्ता की किती खर्च झाला? तुम्ही याचे उत्तर दिल्याशिवाय ही सभा पुढे चालू राहणार नाही.**

**श्री राजेश कळके (सी.डी.एम.)- गावंडे साहेब, तुम्ही जमिन बघायला गेले होतात की नाही? मग त्याला काहीतरी खर्च आलाच असेल, मग सांगा तो सभागृहाला.**

मा. सचिव श्री संजय गावंडे- **सन 2018-19** मध्ये **रु.8830/- खर्च झालेला आहे.**

**श्री राजेश कळके (सी.डी.एम.)- एकूण खर्च किती आला ते सांगा.**

मा. सचिव श्री संजय गावंडे- **एकूण खर्च सन 2018-19चा मी आता सांगितला. त्याच्या अगोदरचा खर्च पाहण्यासाठी तुम्हाला संस्थेत यावे लागेल.**

**श्री राजेश कळके (सी.डी.एम.)- ठीक आहे. पुढे जाऊया.**

**श्री प्रकाश पाटील (एस.आय.आर.डी.)- पुढे पण खुप विषय आहेत, म्हणून मला सभेचा वेळ वाया घालवायचा नाही, पण मी काय बोलतोय ते लक्षात ठेवा.**

**मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर मला अजूनही मिळालेले नाही. हा मुद्दा नमूद करावा.**

**श्री राजेश कळके (सी.डी.एम.)- पुन्हा जमिन पहायला जाणार का?**

मा. सचिव श्री संजय गावंडे- तुम्हाला याचे उत्तर लेखी स्वरूपात दिले आहे तसेच ते बीटीएसवर देखील पसिद्धद करण्यात आले आहे.

त्यानंतर **विषय क्र.1वर** चर्चा होऊन **ठराव पास करण्यात आला.**

ठराव क्र.1: ठराव पास करण्यात आला की दि.24 ऑगस्ट 2018 रोजी झालेल्या 57व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त दि.19 ऑगस्ट 2019 रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत वाचून सभागृहाने एकमताने मंजूर केले.

**सूचक - श्री प्रकाश पाटील**

**अनुमोदक - श्री सुरेंद्र सारंग**

ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

**मानद सचिवांनी** विषय क्रमांक 2 वाचून दाखवला.

<u>विषय क्र.2- 1 एप्रिल 2018 ते 31 मार्च 2019 या कालावधीचा वार्षिक अहवाल, शासकीय लेखापरीक्षित ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्वीकारुन त्यास मंजूरी देणे.</u>

**श्री राजेश झडे (यु.ई.डी.)- मागच्या वर्षी आपण सभासद वर्गणीवर 12% व्याज जाहीर केले होते.**

**श्री राजेश कळके (सी.डी.एम.)- मागच्या वर्षी नाही, त्याच्या मागच्या वर्षी 12% व्याज दिले होते. मागच्या वर्षी 10% व्याज दिले.**

**श्री राजेश झडे (यु.ई.डी.)- माझ्या माहितीप्रमाणे आता वर्गणीवर 2% कमी केले आणि भाग रकमेवर 3% अतिरिक्त डिव्हीडंड जाहीर केला आहे. तर मला असं वाटतं की ह्या वर्षी सुध्दा आपण 3% अतिरिक्त डिव्हीडंड आणि वर्गणीवर 12% व्याज देऊ शकता.तर कृपया आपण असं का केलं नाही ते सांगावं. आपण भाग रकमेवर 3% वाढवून सभासदांचा 450 रुपयांचा फायदा केला, त्याचबरोबर अशी धूळफेक केली की वर्गणीवर 2% कमी करुन आपण सरळ सरळ जी मोठी रक्कम होती त्यावर कमी केले. ज्या सभासदांच्या वर्गणीची रक्कम जास्त आहे, त्याच्या खिशाला सरळ सरळ कात्री लावण्याचा प्रयत्न आहे हा. तर याबद्दल खुलासा करावा.**

**श्री राजेश कळके (सी.डी.एम.)- ज्यांचे सभासद वर्गणीमध्ये एक लाख रुपये जमा आहेत, त्यांना 2% कमी म्हणजे सरळ सरळ दोन हजार रुपयांची कात्री बसली. याचा खुलासा करावा.**

मा. सचिव श्री संजय गावंडे- **प्रथम म्हणजे मागच्या वर्षी 10% होता आणि त्याच्याही मागच्या वर्षी 10%च होता. वर्गणीवर जे व्याज आहे ते 10%च आहे. त्यामुळे त्याच्यात काहीच काट-छाट नाही.**

**श्री प्रदीप पाटील (अकाऊँट्स)- गेल्या वर्षीच्यानफ्यातले 3,42,79,630/- या वर्षीच्या नफ्यात मिळविले आहेत आणि जवळ जवळ 13 कोटीचा नफा संस्थेला झाला आहे. तर आपण 10% ऐवजी 12% देऊ शकता.**

**श्री राजेश झडे (यु.ई.डी.)- संस्थेला 13 कोटीचा नफा झाला आहे त्यामुळे तुम्ही 12% देऊ शकता. मग सभासदांच्या खिशाला कात्री का लावत आहात.**

मा. सचिव श्री संजय गावंडे-**संचालक मंडळाने पुढे होणारा खर्च लक्षात घेऊन व सर्व बघुनच हा निर्णय घेतला आहे. आणि संचालक मंडळाने घेतलेला हा धोरणी निर्णय आहे ह्याचे कारण गेल्या वर्षी सभासद वर्गणी 11 कोटीच्या जवळपास होती आणि यावर्षी सभासद वर्गणी जवळ जवळ 14 कोटी आहे.**

**श्री राम परब - हा निर्णय चुकीचा आहे. आंम्हाला निषेध करायला लावू नका.बरेच वेळा डिव्हीडंड 12% दिलेला आहे.**

**श्री शिवाजी हगवणे (यु.ई.डी.)- याच विषयावर मला बोलायचे आहे.**

**श्री प्रभात सिंग- अध्यक्ष महोदय माझी तुमच्याकडे विनंती आहे. कृपया जेव्हा एक माणूस प्रश्न विचारतो तेव्हा त्याला पहिले संतुष्ट करा. हे काय चालल आहे, कोण येथून येतो बोलायला कोण तिथून येतो बोलायला. पहिल्यांदा त्यांच्या प्रश्नाचे उत्तर मिळू द्या. येथे प्रत्येकाला बोलायचे आहे.**

**श्री शिवाजी हगवणे (यु.ई.डी.)- मला येथे हे विचारायचे आहे की, आपण 2% अतिरिक्त व्याज देऊन सभासदांना संतुष्ट करु शकला असता कारण आपल्याला तेवढा नफा झालेला आहे. मग आपण 2% व्याज कमी का केले?**

मा. सचिव श्री संजय गावंडे- **पहिली गोष्ट व्याज 2% कमी केलेले नाही. वर्गणीवर जे व्याज आहे ते मागच्या वर्षी 10% दिले होते आणि यावर्षी देखील 10% दिलेले आहे. मागच्या वर्षी सभासद वर्गणी 11 कोटीच्या जवळपास होती आणि यावर्षी सभासद वर्गणी जवळ जवळ 14 कोटी आहे. म्हणजे वर्षाला 3**

**कोटी वाढते आहे. शिवाय प्रत्येक सभासदाची सभासद वर्गणी सारखीच नाही. कोणी रु.40,000/-, कोणी रु.50,000/-  तर कोणी रु.500/- प्रत्येक महिन्याला सभासद वर्गणीत टाकतात. त्यामुळे काहींना जास्त फायदा होतो तर काहींना कमी फायदा होतो. त्यासाठी हे जे सबस्क्रिप्शन आहे ते 10% ठेवण्यात आले आहे.**

**श्री प्रभात सिंग-सेक्रेटरी सर, आता तुम्ही जे सांगितले की गेल्या वर्षी पण तुम्ही 10% दिले होते यावर्षी पण 10%, चेंज नाही झालं, तर चेंज का झालं नाही. हे चेंज होऊ शकतं, तर का नाही चेंज झालं. कोणती लाईन खेचली आहे का, की आम्ही फक्त 10%च ठेवू शकतो. आम्ही 15% दिलं आहे, 18% दिलं आहे. हे उत्तर नाही आहे तुमचं की मागच्या वर्षी 10% होतं आणि ह्यावर्षी पण 10% आहे. जर ते सांगत आहेत की 12% होऊ शकतं, तर मग का नाही देत आहात तुम्ही. मागच्या वर्षी 10% दिलं होतं हे उत्तर नाही चालणार.**

मा. सचिव श्री संजय गावंडे**- हे पहा, संस्थेवर जो भार आहे त्याचा विचार करुनच किती व्याज द्यायचे ते ठरते. लेखापरीक्षकांनी देखिल सांगतिले आहे कि संस्थेचा ह्यावर पूर्ण भार वाढला आहे त्यामुळे तुम्ही यावर एवढे व्याज देऊ नका.**

**एक सभासद- सेक्रेटरी सर, एक निनिट, आमचं ऐका, तुम्ही बोललात की हा संचालक मंडळाचा धोरणात्मक निर्णय आहे, तर संचालक मंडळाचे धोरण काय आहे, हे सभागृहाला सविस्तर सांगा ना. जर हे आंम्हाला कळलं तर आम्ही मान्य पण करु शकतो की आम्ही 12% न घेता 10% वरच समाधान मानलं पाहिजे. पण तुमचं धोरण काय आहे हे सभागृहाला कळले पाहिजे ही माझी नम्र विनंती आहे.**

**चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- सन्माननीय सभासदांना विनंति करीत आहे की, ज्या व्याजदराने सभासदांना कर्ज मिळते आज आपण 9% व्याजदराने साधारण कर्ज आणि 9.5% दराने विशेष कर्ज देत आहोत. हे करत असताना जो रेशो असतो दिलेल्या कर्जावर मिळाणाऱ्या व्याजाचा आणि  सभासदांनी आपल्याकडे केलेल्या गुंतवणुकीवर व्याज देण्याचा, तो शेवटी संस्थेला मेंटेन करावाच लागतो. आंम्हाला वाटलं की एवढा डिव्हिडंड द्यावा म्हणून ते आम्ही देऊ शकत नाही**

श्री सुरेंद्र सारंग (ए.एफ.डी.)- अध्यक्ष महोदय, माफी मागतो तुमची. पण ही सभा सेक्रटरी कंडक्ट करत आहेत तरी कृपया सेक्रेटरींनी सभागृहाला संबोधित करणे अपेक्षीत आहे. जर त्याच्या व्यतिरिक्त इतर कोणाला या सभागृहात संबोधन करायचे असले तर त्यांनी कृपया डायसवर येऊन ते करावे. कृपया या विनंतीला मान द्या. कारण ही जी सभा आपल्याला चालवायची आहे ती नियमांच्या तरतुदीनुसार चालवयाची आहे. डायसवरुन सेक्रेटरीच बोलू शकतात.जर कोणाला बोलायचे असेल तर डायसवर येऊन बोलावे. अध्यक्ष महोदय याची काळजी घ्या कृपया. मागच्यावेळी देखील हेच झाले होते. यापुढे असं होणार नाही हे पहा कारण सभा तुम्ही कंडक्ट करत आहात.

चेअरमन श्री राजेंद्र मडगांवकर- सभा शास्त्राच्या नियमानुसार डायसवर जे सन्मानिनिय उपस्थित असतात ते प्रश्नाचे उत्तर देऊ शकत नाही असं कुठल्याही सभा शास्त्रात लिहिलेलं नाही. डायसवर बसलेले बोर्ड ऑफ डायरेक्टर प्रश्नाचे उत्तर देऊ शकतात.

श्री सुरेंद्र सारंग (ए.एफ.डी.)- शासनाचा नियम सांगतो की सेक्रेटरी जर एखाद्या प्रश्नाचे उत्तर गांभिर्याने देत असेल तर तुम्ही असं करु शकता. तुम्ही देऊ शकत नाही असं कोणीहि म्हणत नाही.

संस्थेचे पदसिध्द अध्यक्ष श्री अनंत वजरेकर- आपल्याला प्रश्नाचे उत्तर मिळणे महत्वाचे आहे.

श्री सुरेंद्र सारंग (ए.एफ.डी.)- वजरेकर साहेब, माझा एक सरळ प्रश्न आहे कि ही सभा कोण कंडक्ट करत आहे.

संस्थेचे पदसिध्द अध्यक्ष श्री अनंत वजरेकर- तुमच्या सभा नियमाप्रमाणे प्रश्नाचे उत्तर मिळणे महत्वाचे आहे. काही जाणकार मंडळी येथे उपस्थित आहेत. सभा शास्त्राचे नियम मला माहित नाहीत. पण उत्तर देणाऱ्याने पुढे येऊन उत्तर दिले पाहिजे असा सहकारातला नियम असेल तर तो पाळायला पाहिजे. तर असा काही नियम नाही असं यांचं म्हणणं आहे.

श्री सुरेंद्र सारंग (ए.एफ.डी.)- अध्यक्ष सहेब, नियम असा आहे की, सेक्रेटरी कॅपेबल नसतील उत्तर द्यायला तर कोणीही येऊन उत्तर देऊ शकतं.

संस्थेचे पदसिध्द अध्यक्ष श्री अनंत वजरेकर- सारंग, आपल्या सभेपुढे खुप प्रश्न आहेत त्यामुळे आपण जास्त वेळ वाया न घालावता कामकाज सुरु ठेवावे.

**श्री सुरेंद्र सारंग (ए.एफ.डी.)- मला माहिती आहे सर, सभा वेळेच्या आत संपवायची आहे, पण एकाधिकारशाही नाही चालणार.**

**संस्थेचे पदसिध्द अध्यक्ष श्री अनंत वजरेकर- सेक्रेटरी उत्तर देत आहेत.**

**एक सभासद- अध्यक्ष साहेब, जनरल बॉडीमध्ये फक्त सेक्रेटरीच उत्तर देतील असा कोणताही नियम नाही. चेअरमनला सुध्दा उत्तर** द्यायचा **अधिकार आहे.**

**श्री राम परब - अध्यक्ष साहेब, त्यांना सांगा आम्ही उत्तर तुमच्याकडे मागितले त्यांच्याकडे नाही. त्यांनी उत्तर दिलेले आहे, ह्यांनी मध्ये येऊन असं उत्तर देऊ नये.**

**श्री सुरेंद्र सारंग (ए.एफ.डी.)-अध्यक्ष साहेब, माझ्या डाव्या बाजूचे मित्र असं बोललेत मी नाही बोललो की कोणीही बोलू शकत नाही. त्यांना बोलायचे आहे कि त्यांनी डायसवर यावे. ज्यांना कोणाला बोलायचे आहे त्यांनी डायसवर येऊन सेक्रेटरींना म्हणावं आपण कृपया बसावे कारण मी या प्रश्नाचे चांगले उत्तर देऊ शकतो.**

**एक सभासद- चेअरमनना डायसवर यायची काही गरज नाही, त्यांना तेथूनच बोलायचा अधिकार आहे कोणत्याही विषयावर.**

**श्री सुरेंद्र सारंग (ए.एफ.डी.)- मग प्रत्येक वेळी प्रत्येक विषयावर येऊन बोलू द्या चेअरमनना. मग सेक्रेटरी का बनवला आहे?**

श्री राजेश कळके (सी.डी.एम.)-**सचिव साहेब, डायसवर आल्यामुळे उत्तरामध्ये काही फरक पडणार आहे का?**

मा. सचिव श्री संजय गावंडे- **काही फरक पडणार नाही, पण मला तुम्ही बोलू दिलंत तर मी बोलेन. पण तुम्ही मला बोलूच देत नाही. संस्थेचे आर्थिक धोरण ठरवताना संस्थेचे जे आर्थिक तज्ञ असतात त्यांचा सल्ला घेतला जातो आणि मगच निर्णय घेतले जातात. आपले आर्थिक तज्ञ श्री चंद्रकांत बागल आणि वैधानिक लेखापरीक्षक यांनी हे सांगितले आहे की तुमचं जे सबस्क्रिप्शन आहे ते प्रत्येक वर्षी वाढत चाललेलं आहे. त्यामुळे त्यावर व्याज देताना तुम्ही हे लक्षात घेतलं पाहिजे. तसेच संस्थेचा ABR 8.33% आहे आणि LBR8.33% आहे हे सुध्दा तुम्ही लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे या सर्व बाबींचा विचार करुन**

**किती व्याज द्यायेचे ते ठरवले जाते, त्यानुसार आपण सबस्क्रिप्शनवर 10% व्याज देत आहोत.**

**श्री दिगंबर पाटिल- आपण सांगितले की आपण व्याज10% च्या वर देऊ शकत नाही, तर मग आपण आपले जे शेअर्स आहेत 15,000/- ते 50,000/- करु शकतो का?**

**श्री शिवाजी हगवणे (यु.ई.डी.)- मला सुध्दा हेच विचारायचे आहे की जर एखाद्या सभासदाचे 1 लाख रुपये संस्थेत जमा आहेत त्यापैकी शेअर्सच्या रु.15,000/- वर त्याला डिव्हिडंड 18% म्हणजे रु.2700/- आणि सबस्क्रिप्शनच्या रु.85,000/- वर 10% म्हणजे 8500/- म्हणजे एकूण 11,200/- मिळतात. तेच जर तुम्ही शेअर्सचे रु.50,000/- केलेत तर त्याला डिव्हिडंड 18% म्हणजे 9000/- आणि सभासद वर्गणीच्या रु.50,000/- वर 10% म्हणजे 5000/-असे एकूण रु.14,000/- मिळतील. म्हणजे आताच्या रेट पध्दतीने त्याला रु.2800/- जास्तीचे मिळतील. गेल्या वर्षी देखिल मी हा प्रश्न विचारला होता. जर तुमच्याकडे दूरदृष्टी असती आणि सभासदांच्या खिशात तुम्हाला दोन पैसे टाकायचे असते तर तुम्ही या पध्दतीने निर्णय घेतला असता.मला याच विषयावर बोलायचे होते की वार्षिक अहवाल पाहता असे दिसते की, गेल्या वर्षीचा शिल्लक नफा रु.3,42,79,630/- तुम्ही ह्या वर्षी वर्ग केलेला आहे. मला वाटते हे तुमचे शेवटचे वर्ष आहे. यावर्षी तुम्ही डिव्हीडंड 3% वाढवून देत आहात. पण ह्या 3%ने सभासद खुश होणार नाहीत. त्यापुढची गोष्ट सांगतोय या वर्षी तुम्ही शिल्लक नफा पुढील वर्षासाठी वर्ग हा रु.1,64,90,819/- म्हणजेच रु.1,77,88,811/- कमी म्हणजे 51.89% घट झाली आहे. ही अभिमानाची गोष्ट नाही आहे.**

सदरच्या विषयावर संपूर्ण चर्चा झाल्यानंतर

ठराव क्र.**2** ठराव पास करण्यात आला की **1** एप्रिल **2017** ते **31** मार्च **2018** या कालावधीचा वार्षिक अहवाल**,** शासकीय वैधानिक लेखापरीक्षित ताळेबंद**,** नफा-तोटा पत्रक स्विकारुन त्यास सभागृहाने एकमताने मंजुरी दिली.

सूचक : श्री यदुवीर सिंग

अनुमोदक: श्री राम परब

ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

संस्थेचे मा. सचिव श्री संजय गावंडे यांनी विषयपत्रिकेवरील विषय क्र.3 वाचून दाखविला.

विषय क्र.3 संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणीस मान्यता देणे तसेच सन 2019-20च्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.

अशा प्रकारे संचालक मंडळाने मांडलेल्या नफा विभागणीवर चर्चा झाली व चर्चेअंती विषय क्र 3 पास करण्यात आला.

ठराव क्र. 3: ठराव पास करण्यात आला की, संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणीस तसेच सन 2019-20च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

सुचकः श्री प्रदीप पाटील

अनुमोदकः श्री राजेश कळके

ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

मा. सचिव श्री संजय गावंडे यांनी विषयपत्रिकेवरील विषय क्र.4 वाचून दाखविला.

विषय क्र.4 **इमारत निधी अंतर्गत संस्था उपविधी क्र.1.1.ग अन्वये संस्थेसाठी स्थावर मालमत्ता (अणुशक्तिनगरच्या जवळपास संस्थेच्या कायालयासाठी व महाराष्ट्रातील पर्यटनस्थळी विश्रांतीगृह निर्माण करण्यासाठी जागा/इमारत) खरेदी करण्याबाबत.**

सदर विषयावर काही सभासदांनी सभागृहात गोंधळ घालून चर्चा होऊ दिली नाही. त्यामुळे सदर विषयावर चर्चा होऊ शकली नाही.

मा. सचिव श्री संजय गावंडे यांनी विषयपत्रिकेवरील विषय क्र.5 वाचून दाखविला.

विषय क्र.5 शासकीय लेखापरिक्षक व अंतर्गत लेखापरिक्षक यांच्या सन **2018-19** या आर्थिक वर्षाच्या हिशोब तपासणी अहवालाची नोंद घेणे.

मा.सचिव श्री संजय गावंडे यांनी सांगितले की पान क्र.**94,95** वर अहवाल दिलेला आहे.त्याला मंजुरी द्यावयाची आहे.

चर्चेअंती विषय क्र **5** पास करण्यात आला.

ठराव क्र.**5** ठराव पास करण्यात आला की शासकीय लेखापरीक्ष**क व** अंतर्गत लेखापरिक्ष**क यांच्या सन 2018-19 या आर्थिक वर्षाच्या हिशोब तपासणी** अहवा**लाची नोंद घेऊन तो सर्वसाधारण सभेने एकमताने मंजुर केला.**

सूचकः श्री शिवाजी हगवणे

अनुमोदकः श्री राजेश झडे

ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

मा. सचिव श्री संजय गावंडे यांनी विषयपत्रिकेवरील विषय क्र.**6** वाचून दाखविला.

विषय क्र.**6** सन **2019-20** या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षक यांची नेमणूक करणे.

मा.सचिव श्री संजय गावंडेः आपल्या संस्थेच्या वैधानिक लेखापरिक्षणाकरीता एकूण **5** लेखापरीक्षकांच्या फर्मचे अर्ज संस्थेस प्राप्त झाले आहेत. ते पुढीलप्रमाणे-

| S.N. | Name of Firm | Grade | Fee quoted |
|---|---|---|---|
| 1 | M/s JRT & Associates (Somwar Peth, Pune) | A1 | Rs.10,55,940/- + GST |
| 2 | M/s P.P.Mutha & Associates (Santacruz Mumbai) | A1 | 65% of Annual turnover of prescribed Govt. Fees 2018-19 + GST applicable |
| 3 | M/s A S Bedmutha & Co. (Garkheda, Aurangabad) | A1 | Rs.10,25,000/- Annual turnover 2019-20, GST not mentioned. |

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | M/s Vivek Joshi & Associates (Goregaon, Mumbai) | A1 | 70% of Annual turnover of prescribed Govt. Fees 2018-19 +GST 18% |
| 5 | M/s R.P.D. Associates (Sharapur Road, Nasik) | B1 | 80% of Annual turnover of prescribed Govt. Fees 2019-20 +GST |

चर्चेअंती विषय क्र.6 पास करण्यात आला.

ठरावः **ठराव पास करण्यात आला की, आर्थिक वर्ष सन 2019-20 या कालावधीसाठी प्राप्त झालेल्या वैधानिक लेखापरीक्षकांच्या निविदा सर्वसाधारण सभेत मांडण्यात आल्या. आलेल्या निविदांमधून मेसर्स पी.पी.मुथा अँड असोसिएट्स यांची निवड केली असून त्यांचा Mem No.F-010201 व Firm Reg. No.12152900 असा आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेने त्यांचा लेखापरीक्षणातील अनुभव लक्षात घेऊन सन 2019-20 या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षक म्हणून मेसर्स पी.पी.मुथा अँड असोसिएट्स यांची एकमताने निवड केली.**

**सुचक: श्री प्रभात सिंग**

**अनुमोदक: श्री राजापुरे**

ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

मा. सचिवांनी विषय क्र.7 वाचून दाखविला

विषय क्र.**7:** सन **2017-18** या आर्थक वर्षाच्या हिशोब तपासणी अहवालाची व त्यासंबंधी**च्या** दोष दुरुस्ती अहवालाची (**compliance report)** नोंद घेणे.

मानद सचिवांनी सन **2017-18** या आर्थिक वर्षाचा हिशोब तपासणी अहवाल व त्यासंबंधीचा दुरुस्ती अहवाल सभेस वाचून दाखविला. त्यावर चर्चा

झाली व शासकीय ऑडिटरनी दिलेल्या सुचनांवर जास्त भर देऊन पुन्हा असे रिमार्क येणार नाहीत याची काळजी घ्यावी असे ठरविले त्याप्रमाणे

ठराव क्र.**7:** ठराव पास करण्यात आला सन **2017-18** या आर्थिक वर्षाचे हिशोब तपासणी अहवाल व त्यासंबंधीचा सहकार विभागाकडे सादर केलेला दोष दुरुस्ती अहवालाचे वाचन दि. दि.**19** ऑगस्ट **2019** रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत सादर केले असता सभागृहाने या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेऊन एकमताने मंजूर केला.

सूचकः श्री प्रदीप पाटील
अनुमोदकः श्री सुरेंद्र सारंग
ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

विषय **क्र.8** संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधी दुरुस्तीस (परिशिष्ट **"**अ**")** प्रमाणे मंजुरी देणे.

मा. सचिव- अहवालात पान क्रं**.102, 103** वर आपण परिशिष्ट "अ" दिलेले आहे**.** त्यामध्ये अमेंडमेंट दिलेली आहे की दिर्घ मुदत कर्ज मर्यादा पहिल्या **5** वर्षासाठी प्रतीवर्ष रु**.2,40,000/-** व **6** वर्षे पूर्ण सभासदत्वास त्याची वेतन क्षमता पाहून जास्तीत जास्त रु**.22**लाख यापैकी जी कमीत कमी रक्कम असेल ती रक्कम मंजूर करणे याबाबत. चर्चेअंती

ठराव क्र.**8** ठराव पास करण्यात आला की संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधी क्र. फ.**1.10** कर्जविषयक धोरण **1)** ब) **i)** दिर्घ मुदत कर्ज मर्यादा पहिल्या **5** वर्षासाठी प्रतीवर्ष रु**. 2,40,000/-** व **6** वर्षे पूर्ण सभासदत्वास त्याची वेतन क्षमता पाहून जास्तीत जास्त रु**.22**लाख यापैकी जी कमीत कमी रक्कम असेल ती रक्कम मंजूर करणे या उपविधी दुरुस्तीस सभागृहाने एकमताने मंजूरी दिली व सदर उपविधी दुरुस्ती मा. सहकार आयुक्त पुणे यांचे मंजुरीसाठी लवकरात पाठविण्यात यावी असा सभागृहाने एकमताने ठराव मंजूर केला.

सूचकः श्री यदुवीर सिंग
अनुमोदकः श्री राजेश झडे
ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

सेक्रेटरींनी विषय क्रमांक **9** वाचून दाखवला.

विषय क्रं.**9-** अधिमंडळाच्या **58**व्या वार्षि क सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

मा. सचिव श्री संजय गावंडेः आजच्या या सर्वसाधारण सभेसाठी अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुउपस्थिती क्षमापित करावयाची आहे. चर्चेअंती

ठराव क्र.**9:** ठराव पास करण्यात आला की दि.**19** ऑगस्ट **2019** रोजी काही कारणाने तसेच कामकाजानिमित्त बाहेर असलेल्या सभासदांची आजच्या सर्वसाधारण सभेस उपस्थित नसलेल्या सभासदांची उपस्थिती मंजूर करुन त्यांना संस्थेचे क्रियाशील सभासद म्हणून कायम करण्यात यावे असा निर्णय सभागृहाने एकमताने मंजूर केला.

सूचकः श्री राजेश कळके

अनुमोदकः श्री प्रकाश पाटील

ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

सेक्रेटरींनी विषय क्रमांक **10** वाचून दाखवला.

विषय क्रं.**10-** माननीय अध्यक्ष यांच्या परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयांबाबत विचार करणे.

**सदर विषयाबाबत कुठलाही प्रश्न नव्हता.**

मा. सचिव श्री संजय गावंडेः सर्व सभासदांचे मी आभार व्यक्त करतो आणि सर्वांना विनंती करतो की राष्ट्रगीतासाठी सर्वांनी उभे रहावे.

राष्टगीत झाल्यानंतर मा. सचिवांनी सन 2017-18च्या लाभांशाचे वाटप सभासदांच्या मागणीनुसार बँक खात्यात किंवा सोसायटीच्या बचत ठेव खात्यात वर्ग करण्यात येईल असे जाहीर केले व त्यानंतर पदसिद्ध अध्यक्षांनी सभा संपल्याचे घोषीत केले.

धन्यवाद!! धन्यवाद!!!!!!